वाहतूक, उत्पादन खर्च वाढणार

क्रिसीलचा अहवाल; पेट्रोल आणि डिझेल दरवाढीचा फटका

दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. पेट्रोल आणि डिझेलच्या दरवाढीमुळे अर्थव्यवस्थेवर महागाईचा दबाव वाढण्याची शक्यता आहे, त्यामुळे येत्या काही महिन्यांत वाहतूक आणि उत्पादन खर्च वाढू शकतो.

ग्राहक वस्तूंच्या किमतीही वाढू शकतात. रेटिंग एजन्सी क्रिसीलने मंगळवारी प्रसिद्ध केलेल्या एका अहवालात हा अंदाज वर्तवला आहे. अहवालानुसार, १५ मे पासून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर अंदाजे ७.५ रुपयांची वाढ झाली. जर कच्च्या तेलाच्या किमती वाढलेल्या राहिल्या, तर नजीकच्या भविष्यात ही वाढ प्रति लिटर १० रुपयांपर्यंत पोहोचू शकते. क्रिसीलने म्हटले आहे की, याचा परिणाम वाढलेल्या वाहतूक खर्चाच्या रूपात संपूर्ण अर्थव्यवस्थेवर दिसून येईल, त्यामुळे अन्न आणि इतर वस्तूंच्या किमती वाढतील. अहवालानुसार, इंधनाच्या दरवाढीचा महागाईवर थेट परिणाम होईल. इंधनाच्या दरात प्रति लिटर ७.५ रुपयांची वाढ झाल्यास किरकोळ महागाई अंदाजे ०.३६ टक्क्यांनी वाढू शकते. जर इंधनाच्या दरात प्रति लिटर १० रुपयांची वाढ झाली, तर किरकोळ महागाई सुमारे ०.४८ टक्क्यांनी वाढू शकते.

अहवालानुसार, वाढत्या इंधन दरांचा सर्वांत मोठा परिणाम रस्ते वाहतुकीवर होईल, कारण तिचा सुमारे ४२ टक्के खर्च इंधनावर अवलंबून असतो. परिणामी मालवाहतुकीचा खर्च वाढेल, देशातील सुमारे ७१ टक्के मालवाहतूक रस्त्याने होते. त्याचा परिणाम दैनंदिन वस्तूंच्या किमतींवर होईल. सप्टेंबर २०२५ मध्ये जीएसटी दरांमध्ये होणारी कपात काहीसा दिलासा देऊ शकते. परंतु, त्यामुळे वाढलेल्या ऊर्जा खर्चाचा परिणाम पूर्णपणे भरून निघणार नाही. अहवालानुसार, चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यांत कच्च्या तेलाची सरासरी किंमत प्रति बॅरल ११२ डॉलर होती, जी संपूर्ण वर्षाच्या प्रति बॅरल ९५ डॉलरच्या अंदाजापेक्षा अधिक आहे. जरी एकूण महागाई सध्या भारतीय रिझर्व्ह बँकेच्या चार टक्के लक्ष्यापेक्षा कमी असली तरी, ती आणखी वाढण्याची शक्यता आहे. तथापि, ती रिझर्व्ह बँकेच्या दोन ते सहा टक्के मर्यादेत राहू शकते.

रिझर्व्ह बँक महागाईच्या प्रवृत्तींवर, विशेषतः कुटुंबांच्या अपेक्षांवर आणि व्यापक भाववाढीच्या जोखमींवर लक्ष ठेवत राहील. अहवालात असेही म्हटले आहे की, रिझर्व्ह बँक कमकुवत मान्सून आणि एल निनो यांसारख्या हवामानाशी संबंधित परिस्थितीवर लक्ष ठेवेल, ज्यामुळे अन्नधान्याची महागाई वाढण्याची शक्यता आहे.

खाद्यपदार्थांच्या किमतीत होणार वाढ

क्रिसिलच्या मते, वाढत्या वाहतूक खर्चामुळे दूध, फळे, कडधान्ये, चहा आणि कॉफी, मसाले, अंडी, मांस आणि मासे यांसारख्या खाद्यपदार्थांच्या किमती वाढू शकतात, कारण हे पदार्थ वाहतूक व्यवस्थेवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहेत.

उत्पादनाचे प्रमाण कमी होणार

वस्त्रोद्योग, ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स, लाकडी उत्पादने, सिमेंट आणि सिरॅमिक्स यांसारख्या क्षेत्रांमध्येही खर्च वाढेल. रसायने, कोळसा आणि धातू क्षेत्रांवरही महागाईचा परिणाम होईल. अशा परिस्थितीत, कंपन्या वाढीव खर्च ग्राहकांवर टाकू शकतात किंवा उत्पादनाचे प्रमाण कमी करू शकतात.

दर स्थिर; रोज ५५ लाख लिटर दूध विक्री

मदर डेअरीचे अध्यक्ष मीनेश शाह यांची माहिती

दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. दुधाचा पुरवठा पुरेसा असून सध्या किरकोळ दरात वाढ करण्याचा कुठलाही विचार केला नसून दुधाचे दर स्थिर ठेवण्यात आले आहे. गेल्या महिन्यात, मदर डेअरीने दुधाच्या दरात प्रति लिटर दोन रुपयांनी वाढ केली. मदर डेअरी विविध राज्यांमध्ये दररोज अंदाजे ५५ लाख लिटर दुधाची विक्री करते. वाढत्या खर्चाचा परिणाम अंशतः भरून काढण्यासाठी कंपनीने १४ मे रोजी विविध दुग्धजन्य पदार्थांच्या दरात प्रति लिटर दोन रुपयांनी वाढ केली होती. मदर डेअरी

विविध राज्यांमध्ये दररोज अंदाजे ५५ लाख लिटर दुधाची विक्री करते. वाढत्या खर्चाचा परिणाम अंशतः भरून काढण्यासाठी कंपनीने १४ मे रोजी विविध दुग्धजन्य पदार्थांच्या दरात प्रति लिटर दोन रुपयांनी वाढ केली. पत्रकार परिषदेत मदर डेअरीचे अध्यक्ष मीनेश शाह म्हणाले की, कंपनीने जवळपास वर्षभराच्या कालावधीनंतर गेल्या महिन्यात दुधाच्या दरात वाढ केली होती. ही वाढ वाढलेल्या खर्चामुळे झाली होती. दुधाच्या दरात आणखी वाढ होण्याच्या शक्यतेबाबत विचारले.

३ वर्षांत व्यवसाय दुप्पट करण्याचे इन्शुरन्सचे उद्दिष्ट

दिल्ली. जनरल सेंट्रल लाईफ इन्शुरन्सचे बँकाश्युरन्स चॅनलच्या माध्यमातून पुढील तीन वर्षांत आपला व्यवसाय दुप्पट करून २,००० कोटी रुपयांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे. इटलीची जनरल आणि सार्वजनिक क्षेत्रातील सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांच्यातील या ७४:२५ संयुक्त उपक्रमाने २०२५-२६ या आर्थिक वर्षात ९६४ कोटींचा पहिल्या वर्षाचा प्रीमियम जमा केला. आमचे बँकिंग भागीदार, सेंट्रल बँक ऑफ इंडिया व एजन्सी भागीदारांच्या पाठिंब्याने आम्ही तीन वर्षांत व्यवसाय दुप्पट करून २,००० कोटीपर्यंत नेण्याची अपेक्षा करतो.

तज्ज्ञांचे मत; आयातीवर अवलंबून

भारत-ओमान कराराने आर्थिक सुरक्षेला बळ

दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. आखाती प्रदेशातील अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर भारत आणि ओमान यांच्यातील मुक्त व्यापार करार भारताची ऊर्जा आणि आर्थिक सुरक्षा मजबूत करेल, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. दोन्ही देशांमधील हा व्यापार करार १ जून रोजी अंमलात आला. सीआरएफ या संशोधन संस्थेचे अध्यक्ष शिशिर प्रियदर्शी म्हणाले, सर्वप्रथम, यामुळे अस्थिर प्रदेशात भारताची ऊर्जा आणि आर्थिक सुरक्षा मजबूत होते. ओमान हा आखाती प्रदेशात भारताच्या सर्वांत विश्वासू भागीदारांपैकी एक राहिला आहे. भारत तेल, वायू आणि पेट्रोकेमिकल आयातीवर अवलंबून आहे. ओमानसोबतचे सखोल आर्थिक एकीकरण या महत्त्वाच्या संबंधांसाठी अधिक स्थिर आणि मजबूत चौकट तयार करते. युद्ध त्यानंतर होर्मुझच्या सामुद्रधुनीतील नाकेबंदीमुळे कृषी आणि ऊर्जा उत्पादनांसह विविध क्षेत्रांतील पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे.

शेअर

बीएसई	७४,६४९.०० (▲ ३८२.५०)
निफ्टी	२३,४८३.५५ (▲ १००.९५)
सोने स्टँडर्ड (10 ग्रॅम)	
सोने	नागपूर १,५७,८००(▲) मुंबई १,५७,६००(▲)
चांदी (प्रतिकिग्रॅ)	
चांदी	नागपूर २,६८,८००(▲) मुंबई २,६७,८००(▲)
₹/डॉलर (प्रति डॉलर)	९५.२९
कच्चे तेल (प्रति बॅरल)	९३.७६

Short News

स्टीलची उलाढाल ७०० कोटी पार

दिल्ली. राठी स्टील अँड पॉवर लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२६ मध्ये चांगली कामगिरी केली. ४२% वाढीसह एकूण ७१६ कोटी रुपयांची उलाढाल नोंदवली. कंपनीचा निव्वळ नफा ३९ टक्क्यांनी वाढून १२.८७ कोटी रुपयांवर पोहोचला. स्टेनलेस स्टील लाँग प्रॉडक्ट्स आणि टीएमटी बार्सची उत्पादक असलेल्या राठी स्टीलने गेल्या वर्षीच्या चौथ्या तिमाहीत एकूण उलाढीत ६३ टक्क्यांची दमदार वाढ नोंदवत २४५ कोटी रुपयांची उलाढाल गाठली. तर तिमाही नफा ९६ टक्क्यांनी वाढून ७.४५ कोटी रुपयांवर पोहोचला.

सेन्सेक्स ३८२ अंकांनी वधारला

शेअर बाजारात तेजी

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. माहिती तंत्रज्ञान (आयटी) स्टॉक्समधील जोरदार खरेदीमुळे देशांतर्गत शेअर बाजार मंगळवारी तेजीत बंद झाले. आणि सलग चार दिवसांची घसरण थांबली. सेन्सेक्स ३८२ अंकांनी वधारला, तर निफ्टी १०१ अंकांनी वाढीसह बंद झाला. बीएसईचा ३०-शेअर बेंचमार्क निर्देशांक, सेन्सेक्स, ३८२.५० अंकांनी किंवा ०.५२ टक्क्यांनी वाढून ७४,६४९.८४ वर बंद झाला. व्यवहारादरम्यान, सेन्सेक्स ७३,८१५.१२ च्या नीचांकी पातळीवरून १,०४७.०७ अंकांनी वाढून ७४,८६२.१९ वर पोहोचला होता. निर्देशांकातील ३० पैकी २० स्टॉक्स वाढीसह बंद झाले. त्याचप्रमाणे, नॅशनल स्टॉक एक्सचेंजचा बेंचमार्क निर्देशांक, निफ्टी, देखील १००.९५ अंकांनी, म्हणजेच ०.४३ टक्क्यांनी वाढून २३,४८३.५५ अंकांवर बंद झाला. सेन्सेक्स कंपन्यांमध्ये, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसने ६.५३ टक्क्यांची सर्वाधिक वाढ नोंदवली. इन्फोसिस ५.६६ टक्के, एचसीएल टेक ४.०८ टक्के आणि टेक महिंद्रा १.७६ टक्क्यांनी वाढले.

- **कच्चे तेल** : जागतिक तेल बेंचमार्क ब्रेंट क्रूड १.२८ टक्क्यांनी घसरून प्रति बॅरल ९३.७६ डॉलरवर व्यवहार करत होता.
- **जागतिक बाजारपेठ** : इतर आशियाई बाजारांमध्ये, दक्षिण कोरियाचा कोस्पी, चीनचा शांघाय कंपोझिट आणि हाँगकाँगचा हँग सेंग वधारले, तर जपानचा निक्केई घसरणीसह बंद झाला. दुपारच्या सत्रात युरोपियन बाजारांमध्ये तेजी दिसून आली.
- **रुपया १० पैशांनी घसरला** : जागतिक कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये झालेली वाढ आणि सुरक्षित गुंतवणुकीमुळे रुपया डॉलरच्या तुलनेत १० पैशांनी घसरून ९५.२९ वर आला आंतरबँक परकीय चलन बाजारात रुपया ९५.१६ वर उघडला आणि दिवसभरात ९५.०३ पर्यंत उच्चांक आणि ९५.३१ पर्यंत नीचांक गाठला. मंगळवारी रुपया मागील बंद भावापेक्षा १० पैशांनी घसरून ९५.२९ (तात्पुरता) वर बंद झाला.

रस्त्यांसाठी २ अब्ज डॉलर कर्ज

मंत्रिमंडळाची मान्यता; ६,२२१ कोटी प्रकल्पखर्च

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. राज्यातील रस्ते पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावून 'एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था' उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राज्य रस्ते सुधारणा प्रकल्प (एमआरआयपी) राबविण्यास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी आशियाई पायाभूत गुंतवणूक बँक आणि न्यू डेव्हलपमेंट बँकांकडून प्रत्येकी १ अब्ज अमेरिकी डॉलरचे अर्थसाह्य दोन टप्प्यांत घेण्यास मान्यता दिली. त्यामुळे राज्यातील प्रमुख रस्ते मार्गिकांचे आधुनिकीकरण आणि दर्जावाढ होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.रस्त्यांची भारतीय रस्ता काँग्रेसच्या मानकांनुसार सुधारणा करण्यासाठी हा प्रकल्प पुढील ३ वर्षांत राबविणार आहे. एआयआयबी व एनडीबीच्या पहिल्या टप्प्यात प्रत्येकी ५०० दशलक्ष अमेरिकी डॉलरचे बाह्य अर्थसाह्य व २१५ दशलक्ष डॉलरचा राज्य शासनाचा हिस्सा मिळून ७१५ दशलक्ष डॉलर खर्च अपेक्षित आहे. दोन्ही टप्प्यांची प्रकल्प किंमत प्रत्येकी १२,४४२ कोटी असणार आहे. प्रकल्पांतर्गत मोठी वाहतूक वर्दळ आणि ४० टक्क्यांहून अधिक व्यावसायिक वाहनांची ये-जा असलेल्या 'ग्रोथ कॉरिडॉर'मधील रस्त्यांना प्राधान्य दिले जाणार आहे. त्यामुळे औद्योगिक, कृषी, व्यापारी व आर्थिक दृष्ट्या महत्त्वाच्या मार्गिकांची वाहतूक अधिक सुलभ व कार्यक्षम होणार आहे.

पहिला टप्पा असेल १,५०० कि.मी.चा : दोन्ही वित्तीय संस्थांच्या कर्जसाह्याची रचना, परतफेडीची प्रक्रिया आणि कार्यपद्धती समान आहे. एआयआयबीच्या अर्थसाह्यातून पहिल्या टप्प्यात ७५० कि.मी. लांबीच्या रस्त्यांची कामे बांधकाम विभागामार्फत ईपीसी तत्त्वावर स्पर्धात्मक निविदेद्वारे करण्यात येतील.

३५०० किमी ग्रामीण रस्ते ६ हजार ४२९ कोटी खर्च

मुंबई. राज्यातील ग्रामीण संपर्क व्यवस्था सक्षम करण्यासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-३ अंतर्गत आशियाई इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँकेच्या अर्थसाह्याने ३,५०० कि.मी. लांबीचे रस्ते व पुलांच्या कामांसाठी ६,४२९ कोटींच्या तरतुदीस मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता दिली. योजनेसाठी एआयआयबीकडून ५०० दशलक्ष अमेरिकी डॉलर्स (सुमारे ४,५०० कोटी रुपये) कर्ज स्वरूपात मिळणार असून, शासनाकडून ३० टक्के हिस्सा म्हणून २१५ दशलक्ष अमेरिकी डॉलर्स (सुमारे १,९२९ कोटी रुपये) देण्यात येणार आहेत. प्रकल्पात ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्गांच्या दर्जोन्नतीची कामे होणार आहेत. सविस्तर प्रकल्प अहवालाबरहुकूम ३,५०० कि.मी. लांबीचे रस्ते व पुलांची कामे हाती घेण्यात येतील. एआयआयबीकडून मिळणाऱ्या कर्जाची मूळ रक्कम व व्याजाची परतफेड अर्थसंकल्पीय तरतुदीतून करण्यात येणार आहे. कर्जाची परतफेड ५ वर्षांच्या वाढीव कालावधीसह २५ वर्षांत करणार आहे. योजनेच्या टप्पा-३ साठी मंजूर लांबीपैकी राज्य निधीतून स्वतंत्रपणे २,५०० कि.मी. लांबीच्या रस्त्यांची कामे हाती घेण्यासही मान्यता मिळाली आहे.

रबी धान खरेदीत ६० टक्के वाटा

मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी

हैदराबाद, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. चालू रबी हंगामात देशभरातून खरेदी झालेल्या एकूण धानामध्ये तेलंगणाचा वाटा ६० टक्के आहे, असे तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी मंगळवारी सांगितले. आतापर्यंत सरकारने ६३.६५ लाख मेट्रिक टन धान खरेदी केले असून ११,९०३ कोटी रुपये थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले आहेत. त्यांनी पुढे सांगितले की, अवकाळी पावसामुळे बाधित झालेल्या भागांतील शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी सरकारने सुमारे १०,००० मेट्रिक टन ओल्या धानाचीही खरेदी केली आहे. मुख्यमंत्री म्हणाले, आज देशात धान खरेदीमध्ये तेलंगणाशी स्पर्धा करू शकणारे दुसरे कोणतेही राज्य नाही. याप्रसंगी (रबी) हंगामात देशभरातून खरेदी केलेल्या एकूण धानामध्ये तेलंगणाचा वाटा ६० टक्के आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अंदाजानुसार, तेलंगणाने २३६.८७ लाख मेट्रिक टन अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन साधले आहे.

कराराच्या तरतुदींना अंतिम स्वरूप देणार

भारत-अमेरिका वाटाघाटी सुरू

दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. भारत आणि अमेरिका यांच्यातील प्रस्तावित अंतरिम व्यापार ारसाठी मंगळवारी येथे तीन दिवसीय चर्चा सुरू झाली. ही चर्चा वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाचे मुख्यालय असलेल्या वाणिज्य भवन येथे होत आहे. अमेरिकन संघाचे नेतृत्व त्यांचे मुख्य वार्ताकार ब्रेंडन लिंच करित आहे, तर भारतीय संघाचे नेतृत्व वाणिज्य विभागातील अतिरिक्त सचिव दर्पण जैन करित आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही बाजू अंतरिम कराराचा तपशील निश्चित करण्यावर आणि सर्वसमावेशक द्विपक्षीय व्यापार करारावर (बीटए) वाटाघाटी पुढे नेण्यावर विचार करित आहे. दोन्ही देशांनी फेब्रुवारीमध्ये या कराराच्या आराखड्याची घोषणा केली होती. ७ फेब्रुवारी रोजी जारी केलेल्या निवेदनात, अमेरिकेने भारतावरील आयात शुल्क ५० टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्यास आणि रशियन तेल खरेदीवरील २५ टक्के शुल्क हटवण्यास सहमती दर्शवली होती. उर्वरित शुल्कदेखील १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा प्रस्ताव होता. तथापि, २० फेब्रुवारी रोजी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेले व्यापक प्रतिशोधात्मक शुल्क रद्द केले. त्यानंतर, अमेरिकन प्रशासनाने २४ फेब्रुवारीपासून १५० दिवसांसाठी सर्व देशांवर एकसमान १० टक्के शुल्क जाहीर केले. एका अधिकाऱ्याच्या मते, या बदलांच्या पार्श्वभूमीवर दोन्ही पक्ष फ्रेमवर्क कराराचा आढावा घेऊ शकतात. यापूर्वी एप्रिलमध्ये वॉशिंग्टनमध्ये चर्चा झाली होती. प्रस्तावित फ्रेमवर्कनुसार, भारताने अमेरिकन औद्योगिक उत्पादनांवरील शुल्क रद्द करण्याचा किंवा कमी करण्याचा तसेच पशुखाद्यासाठी लाल ज्वारी, सुकामेवा, ताजी आणि प्रक्रिया केलेली फळे, सोयाबीन तेल, वाईन आणि इतर उत्पादनांसह अनेक कृषी आणि अन्न उत्पादनांवर सवलती देण्याचा प्रस्ताव दिला आहे.



अमेरिका हा भारताचा दुसरा मोठा व्यापारी भागीदार

भारताने पुढील पाच वर्षांत अमेरिकेकडून ५०० अब्ज डॉलर्स किमतीची ऊर्जा उत्पादने, विमाने आणि त्यांचे सुटे भाग, मौल्यवान धातू, तंत्रज्ञान उत्पादने आणि कोकिंग कोळसा खरेदी करण्याचा आपला इरादाही व्यक्त केला आहे. अधिकाऱ्याने सांगितले की, अमेरिकेच्या शुल्क रचनेत अलीकडे झालेल्या बदलांमुळे भारताला श्रीलंका, पाकिस्तान आणि बांगलादेशसारख्या स्पर्धकांवर शुल्काचा फायदा मिळवून देण्यासाठी करारामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता भासू शकते. अमेरिका हा भारताचा दुसरा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये भारताची अमेरिकेला होणारी निर्यात ०.९२ टक्क्यांनी वाढून ८७.३ अब्ज डॉलर झाली, तर आयात १५.९५ टक्क्यांनी वाढून ५२.९ अब्ज डॉलर झाली. व्यापार अधिशेष मागील वर्षीच्या ४०.८९ अब्ज डॉलरवरून घटून ३४.४ अब्ज डॉलर झाला.

आयपीओसाठी प्रीझमला मंजुरी

६,६५० कोटी उभारण्याचे उद्दिष्ट

दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. प्रिझमला तिच्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफर (आयपीओ) द्वारे ६,६५० कोटी उभारण्यासाठी बाजार नियामक सेबीची मंजुरी मिळाली आहे. या प्रकरणाशी संबंधित सूत्रांनी मंगळवारी सांगितले की, प्रस्तावित सार्वजनिक भागविक्रीमुळे कंपनीचे मूल्य ७-८ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. जागतिक ट्रॅव्हल टेक्नॉलॉजी युनिकॉर्न 'ओयो'ची मूळ कंपनी असलेल्या 'प्रिझम'ने, डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत भारतीय प्रतिभूति आणि सेबी गोपनीय मार्गाने आपल्या आयपीओसाठी प्राथमिक कागदपत्रे दाखल केली आहेत. २० डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत भागधारकांनी मंजुरी दिल्यानंतर ही कागदपत्रे दाखल केली. या सभेत इक्विटी शेअर्सच्या नवीन विक्रीद्वारे ६,६५० कोटी रुपयांपर्यंत निधी उभारण्यास मंजुरी देण्यात आली. 'प्रिझम'ने गोपनीय पूर्व-नोंदणी मार्गाचा अवलंब केला. या पर्यायामुळे कंपनीला आपला मसुदा प्रस्ताव दस्तऐवज सार्वजनिकरित्या उघड न करता, त्यावर प्राथमिक अभिप्रायासाठी भारतीय प्रतिभूति आणि विनिमय मंडळाशी संवाद साधता येतो.

वीज तोटा नियंत्रणात आणा

केंद्रीय ऊर्जा मंत्री मनोहर लाल यांचे प्रतिपादन

चंदीगड, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. वीज क्षेत्राची वाढती मागणी पूर्ण करताना त्यातील तोटा कमी करणे ही काळाची गरज असून नियंत्रणात आणा, केंद्रीय ऊर्जा मंत्री मनोहर लाल यांनी म्हटले. ग्राहकांना अखंडित आणि उत्तम वीजपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी वीज कंपन्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा आणि लक्ष्य-आधारित योजना व प्रकल्प राबवा. मंत्री म्हणाले की, वीज ही केवळ एक अत्यावश्यक सार्वजनिक सेवा नव्हे तर उत्पन्नाचा स्रोतही आहे, ज्याच्या उत्पादन आणि वितरणासाठी मोठा खर्च येतो. त्यामुळे, वीज वितरण प्रणाली मजबूत करणे आणि तिचे आधुनिकीकरण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हरयाणाच्या वीज कंपन्यांची कामगिरी आणि विविध केंद्र पुरस्कृत योजनांचा आढावा घेतला. मंगळवारी येथे जारी केलेल्या एका अधिकृत निवेदनात म्हटले की, या बैठकीत हरयाणाचे ऊर्जा मंत्री अनिल विज हे देखील उपस्थित होते.

एआय चिप्सद्वारे चालणार संगणक

टाईप नाही; फक्त कमांड द्या

बीजिंग, वृत्तसंस्था. जगातील सर्वांत मोठी एआय चिप कंपनी एनव्हिडियाने एक नवीन चिप सादर केली आहे, जी भविष्यात वैयक्तिक संगणकांचे जग बदलू शकते. एनव्हिडियाचे सीईओ जेन्सन हुआंग यांनी दावा केला आहे की, गेल्या ४० वर्षांतील संगणक जगतातील हा सर्वांत मोठा बदल असू शकतो. एका कार्यक्रमात एनव्हिडियाने आपली नवीन आरटीएक्स स्पार्क चिप सादर केली. ही केवळ एक ग्राफिक्स चिप नाही, तर एक संपूर्ण सिस्टम-ऑन-चिप आहे. याचा अर्थ असा की, सीपीयू, जीपीयू आणि एआय प्रोसेसिंगची शक्ती एकाच चिपमध्ये एकत्रित केली जाईल. म्हणूनच याला सुपरचिप म्हटले जात आहे. सर्वांत मनोरंजक गोष्ट केवळ नवीन चिप नाही, तर त्यामागील दूरदृष्टी आहे.



अशी आहेत चिपची वैशिष्ट्ये

- आरटीएक्स स्पार्क ही एक एआरएम-आधारित चिप आहे, ज्यात २० पर्यंत सीपीयू कोअर्स, ब्लॅकवेल जीपीयू आर्किटेक्चर आणि १२८ जीबी पर्यंत युनिफाइड मेमरी आहे.
- कंपनीचा दावा आहे की ही चिप १ पेटाफ्लॉप पर्यंत एआय संगणकीय शक्ती देऊ शकते. सोप्या भाषेत सांगायचे तर, हा लॅपटॉपमधील एक छोटा एआय सुपरकॉम्प्युटर असेल.
- आतापर्यंत, बहुतेक एआय टूल्स क्लाउडवर चालतात म्हणजेच तुमचा प्रश्न एका दूरस्थ सर्व्हरवर जातो आणि नंतर त्याचे उत्तर परत मिळते.
- तथापि, आरटीएक्स स्पार्कचे उद्दिष्ट एआयला थेट तुमच्या लॅपटॉपवर आणणे आहे. यामुळे इंटरनेटशिवाय अनेक एआय कार्ये करणे शक्य होईल आणि डेटा गोपनीयतेतही सुधारणा होऊ शकते.

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

नागपूर मंडळात NSG-6 रेल्वे स्टेशनांवर IRS आश्रयांची तरतूद साठी ई-निविदा सूचना

मंडळ विद्युत अभियंता (GSU) द्वारे खालील विविध जीएसयू कामांसाठी ई-निविदा आमंत्रित केले जात आहे:
निविदा सूचना क्रमांक: GSU-EL-G-NAG-2026-27-05 दिनांक: 22.05.2026
कार्य चा नाव: इलेक्ट्रिकल (G) कार्य संबंधित: दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर मंडळात NSG-6 रेल्वे स्टेशनांवर IRS आश्रयांची तरतूद.
निविदा मूल्य: ₹ 2,46,81,290/-
बयाणा रक्कम: ₹ 4,93,600/-
निविदा सादर करण्याची अंतिम तारीख: दिनांक **17.06.2026** च्या **15:00** वाजेपर्यंत.
वरील निविदांबाबत अधिक माहितीसाठी वेब-साइट www.ireps.gov.in पहा.

मंडळ विद्युत अभियंता-जीएसयू, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर
MS/21-82

स्वच्छ भारत अभियान एक कदम स्वच्छता की ओर

उत्तर पश्चिम रेल्वे

खुली ई-निविदा सूचना

क्रमांक: डब्ल्यू/118/निविदा/व.म.ई. (सम.) जयपूर / अभियांत्रिकी दिनांक:30/05/2026 विभागीय रेल्वे व्यवस्थापक, अभियांत्रिकी, उत्तर पश्चिम रेल्वे, जयपूर, भारत सरकारच्या राष्ट्रपतींच्या वतीने, प्रचलित नियमांनुसार विहित नमुन्यात खालील कामांसाठी खालील क्रमाने ई-निविदेद्वारे निविदा आमंत्रित करत आहे: **अनु. क्र.: 1 निविदा क्रमांक/कामाचे नाव:** इंजी./जय/2026-27/52 DO-GGC विभाग: नैसर्गिक किंवा साचलेल्या पाण्याचे निर्जलीकरण, आणि रेन वॉटर हार्वेस्टिंग (RWH) व हाइम पाईप्समधील गाळ काढणे, ADEN/HQ-II/JP यांच्या अधिकारक्षेत्रात. **अंदाजित खर्च:** 16506608.31 **बयाना रक्कम:** 330100/- 1. वरील निविदेचा संपूर्ण तपशील **www.ireps.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सूचना फलक - विभागीय रेल्वे व्यवस्थापक (बांधकाम लेखा), उत्तर पश्चिम रेल्वे, जयपूर यांचे कार्यालय येथे पाहता येईल. **2. निविदा इंजी./जय/2026-27/52** दिनांक 18.06.2026 रोजी 15:00 वाजता बंद होईल आणि उघडण्याची तारीख: 18.06.2026 रोजी 16:00 वाजता.

804-CQ/26

आम्हाला /NWRailways NWRailways_वर फॉलो करा

रेपो दर 'जैसे थे' राहणार

व्याजदरात वाढ शक्य; अर्थतज्ज्ञ यांचा अंदाज

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. अर्थतज्ज्ञ आणि क्षेत्रीय नेत्यांच्या सर्वेक्षणानुसार, भारतीय रिझर्व्ह बँक जूनमधील पतधोरण आढाव्यात रेपो दर अपरिवर्तित ठेवण्याची शक्यता आहे. वाढत्या महागाईच्या धोक्यांमुळे मध्यवर्ती बँक २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या उत्तरार्धात धोरण कडक करणे पुन्हा सुरू करू शकते. अकरा प्रतिसादकर्त्यांनी शुक्रवारी जाहीर होणाऱ्या आगामी पतधोरण आढाव्यात दर अपरिवर्तित राहण्याची अपेक्षा व्यक्त केली, तर चौघांनी ०.२५ टक्के वाढीचा अंदाज वर्तवला आहे. आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या अर्थतज्ज्ञ गौरा सेनगुप्ता म्हणाल्या की, दर अपरिवर्तित ठेवण्याची गरज आहे. कारण एकूण महागाई चार टक्के लक्ष्यापेक्षा कमी आहे. इंधन दरवाढीच्या महागाईवरील दुसऱ्या टप्प्यातील परिणामावर लक्ष ठेवण्यासाठी आरबीआयकडे धोरणात्मक वाव आहे. महागाई लक्ष्यीकरणामुळे पुरवठ्यावरील धक्क्यांच्या पहिल्या टप्प्यातील परिणामाकडे दुर्लक्ष करता येते. पतधोरण समिती (एमपीसी) धोरणात्मक दरांवर निर्णय घेण्यासाठी ३ ते ५ जून दरम्यान बैठक घेणार आहे. मध्यवर्ती बँकेने विकासाला चालना देण्यासाठी गेल्या वर्षापासून रेपो दरात १.२५ टक्क्यांनी कपात केली आहे.

महागाई ५ टक्क्यांपर्यंत वाढणार

अर्थतज्ज्ञांच्या मते, इंधन दरवाढ आणि भू-राजकीय घडामोडींच्या परिणामांचे मूल्यांकन करण्याला आरबीआयने प्राधान्य दिल्यामुळे नजीकच्या काळात दरवाढीत तात्पुरती स्थगिती येण्याची शक्यता आहे. स्टँडर्ड चार्टर्ड बँक (इंडिया) येथील भारत आर्थिक संशोधन विभागाच्या प्रमुख अनुभूती सहाय म्हणाल्या, आम्हाला आता असे वाटते की, देशांतर्गत महागाईचा धोका वाढत असल्याने आणि जागतिक स्तरावर परतावा देखील वाढलेला असल्याने, पतधोरण समिती (एमपीसी) जूनच्या बैठकीपासूनच दरवाढ सुरू करू शकते. काही आशियाई मध्यवर्ती बँकांनी आधीच अनपेक्षित दरवाढीची घोषणा केली आहे. जर वस्तूंच्या किमती आणि रुपयावरील दबाव कायम राहिला, तर आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी आमचा दरवाढीचा अंदाज ०.२५ ते ०.५० टक्क्यांनी वाढू शकतो. या सर्वेक्षणात असेही सूचित करण्यात आले आहे की, आरबीआय आगामी धोरण आढाव्यात आपल्या महागाईच्या अंदाजात वाढ करू शकते. ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी महागाईचा अंदाज सुमारे ४.९ ते ५.५ टक्क्यांपर्यंत वाढवला जाऊ शकतो. याचे कारण म्हणजे जागतिक